A P P E N D I X

जयभवानी

रावबहादूर रघुनाथ पंताजी सबनीस, सी.आय्.ई

दिवाण यांसी.

सार्वभौम ब्रिटिश सरकारांनीं आपला गौरव करून आपल्यास "नाईट बॅचलर" ही बहुमानाची पदवी दिली; त्याजबद्दल आम्हास फार संतोष होत असून आम्ही साम्राज्य सरकारचे आभारी आहो.

आपल्यावर हा ब्रिटिश सरकारचा अनुग्रह होण्यास आम्ही कारणीभूत आहोत असे आपल्यास वाटत आहे. पण तशी वस्तुस्थिती नाहीं. आपल्या राज्यकुशलतेबद्दल व सज्जन-वृत्तीने वागणुकीचे हे ईश्वराने दिलेले फल आहे. तथापि या प्रकारे आपण आमचा जो गौरव केला यात आपले सौजन्य व कृतज्ञता व्यक्त होते.

आपली शांतवृत्ती, भाषण माधुर्य, राजकार्य दक्षता, एकनिष्ठ स्वामीसेवा व सुशीलता इत्यादि सद्गुण आपले अंगीं वसत आहेत; यामुळे - जगांत आपली मान्यता असुन ते आम्हास भुषण आहे. या आपल्या सर्व-मान्य गुणांचा माझे परमपुज्य पिते कैलासवासी हुजूर सरकार यांना लाभ मिळून यांना आपला राजशकट चालविणेस ज्याप्रकारे सुलभता आली; त्याचप्रकारे प्रस्तुत - आमच्या अननुभवी स्थितीत आपले हात असलेले सहाय्य वर्णनीय आहे.

हिंदुस्थानामधील राजेरजवाड्यांत पूर्वी जे सुप्रसिद्ध मुत्सदी होऊन गेले व हल्लीं आहेत त्या मालीकेंत गोंविण्यास आपली पात्रता आली हे पाहून फार आल्हाद वाटतो. कित्तीमान - दिवाण हे राजसौंदर्य आहे.

राजा व प्रजाप्रिय मुत्सदी व ब्रिटिश साम्राज्यासी राजानेष्ट या आपल्या लोकमान्य -

गुणावरून आपल्यास रावबहादूर, सि. आय. ई. व प्रस्तुत नाईट बॅचलर असे मानाहे किताब - मिळालेले आहेत. अर्थात ती आपल्या विद्वत्तेची व प्रेमळ गोड वर्तणूकीची फळे आहेत.

आपल्या सारख्या मुख्य मुत्सद्याचा साम्राज्य सरकारकडून ~~~~ प्रकारे जो बहुमान झाला; याचे आपल्यास तर भूषण आहेच. पण पर्यायाने - माझे अडमिनीस्ट्रेशनची सुकीर्ती व्यक्त करणारी ती गोष्ट आहे याचा आम्हास अभिमान वाटतो.

ऐक्यभाव हे विजय प्राप्तिचे मुख्य कारण आहे. ज्या राज्यात राजा व प्रधान परस्पर सलोख्याने व सहानुभुतीने वागतात तेथे - कोणत्याहि प्रकारचे दोषी राजकारण उपस्थित होणेची शंका व अपजयाची धास्ती बाळगण्याचे कारण रहात नाहीं.

जग त्रिविध आहे; षड्रिपूंचा प्रादुर्भाव ज्या प्रमाणांत होतो त्या दिशेने व जोमाने मनुष्य प्राणी नेग नेगळे रंग उपस्थित करून तसा दृष्टीभेद उपस्थित करीत असतात; त्याप्रकारे कोणी कांहीं भानगडीच्या व उपाधिच्या गोष्टी उत्पन्न करून त्या आपल्या पुढें आल्यास तिकडे आपले ठरलेले विकार विरहीत तत्त्वाप्रमाणें दुर्लक्ष करून आपला इच्छित हेतु सफल होणेचे कामी निराश न होता सचोटीने व चिकाटीने प्रयत्न केला पाहीजे; समय आल्यावर यश प्राप्ती स्वाधीने होईल; कसोटीशिवाय कार्यसिद्धी बहुधा होत नसते.

आपण निस्सीम भक्तीने स्वामीकार्य दक्षतेचे अंगीकृत केलेले बलावरून व आपल्या राजकार्य-धुरंधर या बाणेदार गुणांचे मंडन दर्शक तेजाची-उत्तरोत्तर वृद्धि होऊन त्याचा या उदाहरणाप्रमाणें सुफलाचा लाभ उभयपक्षी होत असावा हे माझ्या राज्याची बळकटी व शोभा उत्पन्न करणारे प्रमुख कारण असल्यावरून त्या आमच्या आशेची सफलता परमेश्वराने करावी अशी त्यास प्रार्थना आहे.

जय भवानी

Rd 13-12-24

रेस कोर्ट चेटी बंगला
गिंडी मद्रास.
९-१२-१९२९

सर रघुनाथराव सबनीस यांसी

अनेक आशीर्वाद:

तुमचे पत्र आले ते पोहोचले. मजकूर समजला. जाफगांव येथे जो कॉन्फरन्स भरणार आहे, त्यामध्ये श्री. महाराज साहेब देवास हे जो ठराव आणणार आहेत त्याचे उत्तर काय करणे बद्दल आमच्या व रा. डॉ. स. सी. सं. आक्का साहेब महाराज यांच्या समक्षीनें राव व आचरेकर यांची योजना केली आहे. त्याचे कारण असें

चि. डॉ. युवराज महाराज व. राव व.

उडु यांचे राव व. आचरेकर हे उत्तम डॉक्टर आहेत असें जर मत असेल तर आपण यांना एवढेच विचारावें की, कॉन्फरन्समध्ये भाग घेणारे सर्व मराठे उच्च जातीचे आहेत काय?

आमचा तारीख १२-१२-१९२८ हा.

आपले येथें मुक्काम असून पुढे दोन दिवस बेंगलूर येथें कुमार पार्कामध्ये मुक्काम होणार आहे.

येथें सर्वांच्या तब्येती बऱ्या आहेत. सर्व कांहीं उत्तम आहे.

तेव्हा इसमाचे नांव सूचवावें किंवा इसमाचे नांव आपण बेंगलूर मुक्कामीं

श्री

कागल
ता० १२/१२/२९

सेवेसी विज्ञापना.

हुजूरचे ता० ९/१२/२९ चे कृपापत्र सादर झाले आज्ञेप्रमाणे श्री युवराज महाराज देवास यांना जाऊन भेटलो. रा. ब. अचरेकर यांना डक्कावर कामकरन्स मध्ये पूर्णपणे वहुन हुजूरना इतकेही योजना यांना पसंत आहे. यांचे तोडीस तोड यांच्याशी सहकारितेने काम करणारे दुसरे इसमासंबंधी हुजूर समक्ष बाटाघाट करून तजवीज करणें बरें असें यांचे म्हणणें आहे. रा. ब. लहू दिवाणसाहेब हे वेळगावास गेले असल्याने यांची सल्ला घेता आली नाही. श्री युवराज महाराजांचा अभिप्राय असा दिसतो की रा. ब. अचरेकरांबरोबर काम करण्यास दुसरा योग्य माणुस मिळाला नाही तरी यांचे एकटे वहुन सुद्धा पुष्कळ कार्यभाग उरकून घेतला आहे.

पुण्यश्लोक श्री आईसाहेब महाराज व सकल सौभाग्यसंपन्न श्री आक्कासाहेब महाराज यांचे चरणी माझे नम्रतापूर्वक मुजरे अर्पित होणे वहुत आज्ञा होणेस विज्ञप्ति आहे.

सेवेसी श्रुत होय ही विज्ञापना

हरदचानम्रसेवक र. बे. सबनीस

नेमनुका वगैरे -

जनरल खाते -

तारिख - 1 सप्टेंबर, 1898

नंबर 11 खान मेहरजीभाई कुंवरजी सी.आय.ई. दिवाण निसबल सरकार करवीर यांनी आपल्यांस प्रकृतीचे आस्वास्थामुळे एक वर्षाची आजारी पणाची रजा तारीख 1 सप्टेंबर, सन 1898 इसवी पासून मिळावी व ही रजा नोकरीतून विश्रांती घेण्याचे तयारीची समजावी म्हणून वगैरे श्रीमन्महाराज छत्रपती साहेब करवीर यांचे हुजूर रिपोर्ट केल्यावरून हुजरून इंग्रजी पत्र नंबर 483 तारीख 31 ऑगष्ट सन 1898 इसीवचे आल्यात रजा मंजूर करण्यांत मेहुन रावबाहादुर रघुनाथ व्यकांजी सबनीस सरसुभे इलाखा करवीर यांची नेमणूक दिवाणाचे जागी केली आहे. असे लिहून आल्या अन्वये खानबहादुर मेहरजीभाई कुंबरजी यांनी आपले ऑफिसचा चार्ज तारीख 1 मिनहु रोजी ऑफिसचे वेळे पूर्वी रावबहादुर रघुनाथ व्यकोजी सबनीस यांस दिला व त्यांनी तो घेतला.

आर.व्ही. सबनीस,

दिवाण नि. सरकार करवीर

ऑर्डर नं. 296

श्री

शंकर प्रसन्न

रा.रा.फिनॅन्शिअल सेक्रेटरी यांसी –

रावबहादुर सबनीस दिवाणसाहेब यांनी लहानपणापासून आमचे घरातील सर्व (राजघराण्यातील व कागल घराण्यातील) मंडळीशी पितृवत् व पुत्रवत् प्रेम केले व आज जो कांही चागलेपण अगर वाईटपणा आम्हाला मिळाला त्याचे सर्व श्रेय त्यांनाच आहे. याबद्दल वर्षाला 6000/- (सहा हजार रुपये) रुपये या प्रमाणे चार वर्षे त्यांना द्यावेत म्हणजे चोवीस हजार रुपये द्यावेत कांही त्यांचे जिवास अपघात झालेस त्यांचे मुलास व कुटुंबास वाटून द्यावेत 12.12.19

खाडकी

12.12.19

ठ.नं. 376

सही मोडी-शाहू छत्रपती

मेहरबान रावबहादूर सबनीस दिवाणसाहेब

नि. सरकार करवीर,

सदरील आज्ञे प्रमाणे अमलास हुकूम देऊन ही नक्की यावयास पाठविली आहे. सेवेशी श्रुत होय ही.

सेवक तारिख - ।। ऑगस्ट, 1934

"श्रीमच्छत्रपती राजाराम महाराजांची एक तपाची उज्वल कारकिर्द"

(श्री.सर रघुनाथराव व्यंकाजीराव सबनीस, के.टी.सी.आय.ई. यांच्याकडून आलेला लेख)

श्रीमच्छत्रपती राजाराम महाराजसाहेबांच्या 37 व्या वाढदिवसाचा समारंभ श्रावण शु. प्रतिपदा तारीख ।।-8-34 शनिवार रोजीसालाबाद प्रमाणे पूर्ण उत्साहाने करवीर राज्यात सर्वत्र साजरा करण्यांत येत आहे. छत्रपती महाराजांनी सुत्रे हाती घेऊन नुकतीच बारा वर्षे पुरी झाली. या एका तपाच्या अवधित या राज्यात झालेल्या सुधारणांच्या दृष्टीने कारभाराचा मर्यालोचनात्मक अक्सालेख "सेवक" पत्राच्या खास अंकाकरिता लिहीण्याबद्दल संपादकाकडून मला आग्रहाचे सांगणे झाले आहे या राज्याशी सेवक या नात्याने माझा संबंध 40 वर्षांचा असल्याने संपादकाच्या शब्दाला मान देणे आवश्यक वाटल्यावरुन मी या आजपर्यंतच्या उदार व उज्वल कारकिर्दीचे त्रोटक वृत्त लिहीले आहे.

कै.श्री शाहु छत्रपती महाराजाची काळ ता.6-5-1922 रोजी झाला. त्या वेळेपासून पूर्ण अधिकारांची राजसुत्रे छत्रपती श्री राजाराम महाराजांज यांच्या हाती आली. कै.महाराजांची कारकिर्द अत्यंत घडाडीची व पूर्ण वैभवशाली झाली. त्यावेळी कित्येकानी असे उद्गार काढले की केव्हा केव्हा रात सांवत्सरीक नरदत्ने निपजतात त्यापैकी सुदैवाने आमच्या कवरीरस्थ प्रजेच्या वाटचालक आले. योहोकडून निघालेल्या प्रसशा निनादाने महाराष्ट्र तर दनानुन गेले. अशा तेजस्वी नृपंशार्दुलांच्या कारकिर्दी नंतर राज्यधुरा श्री राजाराम महाराजा छत्रपतीचे खांद्यावर पडली कै महाराजांनी घातलेल्या या भक्कम पायावर शोभत्या सारख्या इमारती रचण्याचे पुढील काम त्यांच्यावर पडले व भावी कारकिर्दीकडे सर्वांचे डोळे लक्षपूर्वक लागले. असामान्या पुरुषानंतर त्याचे पदावर आरुढ होण्या यावर मोठी जबाबदारी पडते. त्यातून पार पडले किती दुष्कर आहे त्याची पूर्ण जाणीव व श्री राजाराम महाराजांना होती कांही अशी प्रक्षुब्ध झालेले वातावरण शांत करुन कुशल पण धातप्रमाणे राज्यनौका योग्य दिशेने नेने हेच आपले अधिकर्तव्य आहे. असे जानुन तख्त नशीन घाल्याचा सुमारे दोन अडीच वर्षे राज्यातीलसर्व परिस्थितीचे महाराजानी सुक्ष्म निरीक्षण केले. पुण्यप्रतापीकडेलानी महाराष्ट्रातील सामाजिक इतिहासात जी अलौकीक क्रांती

घडवून आणली व समतेच्या तत्वाचे जे बीज रोपण केले तदनुकुल आपले वर्तने ठेवून त्यांच्या मुळाशी असलेले ध्येय कदापि दृष्टीआड करता कामाचे ही जागृती सदैव महाराजानी आपले हृदयात बाळगली. आपल्या प्रजेची सर्वांगीण उन्नती व्हावी या हेतूने निरनिराळया संस्था निर्माण केल्या कित्येकांना प्रोत्साहान व्दारा तर कित्येकांना संस्थाना प्रोत्साहान व्दारा तर देऊन द्रव्यव्दाराही मदत केली. महाराजांच्या औदार्याचा ओघ करवीर राज्याबाहेरीही उपयुक्त संस्थाकडे वहिली आहे. 12 वर्षापूर्वीच्या व हल्लीच्या राज्यकारभाराचे विहंगदृष्टया तुलानात्मक विवेचन केले असता अवघ्या 10-12 वर्षात सर्वत्र सर्व बाजुनी किती वेगाने प्रगती झाली आहे हे सहज लक्षात येईल.

प्रजेच्या उन्नतीचे दर्शक प्राधान्यतेकरून विद्याप्रसार हे आहे. 1922 सालापासून 1934 सालापर्यंतच्या व्दादशाब्दात शाळाची संख्या 559 पासून 816 झाली. बहुतेक त्याचप्रमाणात विद्यार्थ्यांच्या संख्येतही वाढ झालेली आहे. 1922 साली 31,000 विद्यार्थी निरनिराळया शाळेत शिकत आहेत. हे केवळ संख्यात्मक ठोकळ मानाचे आकडे आहेत. परंतु भिन्न भिन्न प्रकारच्या अनेक दर्जाच्या नवीन संस्था किती स्थापन झाल्या हे पाहिले म्हणजे विद्यावृध्दीकडे महाराजांची दृष्टी कितीव्यापक आहे हे निदर्शनास येईल. नवीन उच्च दर्जाच्या संस्था म्हणजे कायदे शिक्षणाची संस्था (लॉ कॉलेज) किंवा दुरूयम प्रतीच्या शिक्षणाकरिता कार्यक्रम तयार करणारी संस्था (बी.टी.कॉलेज) या होत या शिवाय राजाराम कॉलेज मध्यें एम.एस.सी. पर्यंत शास्त्रीय शिक्षण देण्याची तजवीज केली आहे. या संस्थेत ब-याच गरीब होतकरू विद्यार्थ्यांसना शिष्यवृत्ती वगैरे देऊन उच्च शिक्षण घेण्याची त्यांची सोय केली आहे. या सर्व सवलतीच्या सुपरिणामाची साक्ष विद्यार्थ्यांच्या संख्येवरूनच पटत आहे. या विद्यालयात 1922 साली केवळ 280 विद्यार्थी शिक्षण घेत होते. ती संख्या 1933 साली 768 झाली यात विशेष लक्षात ठेवण्याजोगी गोष्ट ही आहे की 768 विद्यार्थ्या पैकी 322 पुढारलेल्या वर्गापैकी असून बाकीचे म्हणजे 446 मागासलेल्या पैकी आहेत. धार्मिक संबंधातही आपल्या कै.पित्यानी जुन्या धर्म पध्दती वर बसलेले किटाण काढून शुध्द वैदिक धर्माची तत्वे शिकविण्याकरिता स्थापनकरीता समाज परिस्थितीस अनुसरून स्थापन केलेल्या वैदिक शाळेस पूर्ण पाठिंबा देऊन निरक्षर प्रजेत नूतन जागृती केली आहे. या शैक्षणिक व धार्मिक प्रगतीबद्दल ज्यांच्या बीजारोपणाचा हा प्रभाव आहे व ज्यांनी मोठया दक्षतेने तदभव वृक्षाचे संगोपन करून

तो वाढविला त्या शाहु महाराजांचे व त्यांचे सुपुत्र वकट्टे अनुयायी श्री राजाराम महाराजांचे जितके धन्यवाद द्यावेत तितके थोडेच.

महाराजांचे लक्ष केवळ संस्कृतीवर शिक्षणाकडेच आहे असे नाही. राज्यात बहुजन समाज शेतक-यांचा व धंदेवाल्याचाच आहे हे ही त्यांच्या हृदयात बाणलेले आहे. म्हणून केवळ कृषीवर अवलंबून राहणा-या वर्गाकरिता श्री शाहु शेतकी शाळा शेतक-यांचे पदार्थ संग्रहालय (अर्थित म्युझियम) व कांही प्राथमिक शिक्षण शाळामध्येंही विद्यार्थ्यांमध्यें शेतक-यांची आवड कायम राण्याकरीता शेतकरी शिक्षणाख्ये वर्ग यांची योजना करण्यांत आली आहे. सहकारी तत्वावर चालण्याच्या तत्वाचा प्रसार होऊन हल्ली हया संस्थाची संख्या 1922 पेक्षा जास्त आहे. याचा शेतकरी वर्गास अनेक प्रकारे उपयोग होऊन त्यांना लोकाप्याने प्रेमाने काय करण्यात उत्साह आला आहे. धंदे शिक्षणाकरिता पूर्वी सुरु केलेली घाटगे टेक्नीकल स्कुल एवढी एकच संस्था होतीतिच्या जोडीला आता कर्नल ओब्रायन टेक्नीकल स्कुल स्थापन होऊन त्यात पाणी काम, वेतकाम, रंगकाम रुप्याचा मुलामा यांत्रिक दुरुस्ती विजेची कामे निरनिराळे 12 प्रकारचे धंदे शिकविण्यात येत आहेत.

1922 सालापर्यंत मुलीस केवळ प्राथमिक शाळा पर्यंतचेच शिक्षण देण्यात येत होते. आता श्री लक्ष्मीबाई साहेब गर्लस हायस्कूल स्थापन होऊन त्या संस्थेत 10 वी पर्यंत (मॅट्रीकयेलेशन) प्रवेश परिक्षेपर्यंत शिक्षण देण्याची तजवीज केली आहे.

अशी सर्व वर्गास त्या त्या वर्गाला योग्य शिक्षणाची सोय झाल्याने जनतेचे पाहून साक्षरतेच्या दिशेने झापाटयाने पुढे चालले आहे. सुप्रीम कोर्ट स्थापनझाल्याने न्याय संस्थेवर अधिकच विश्वास उत्पन्न झाला आहे.

1922 पूर्वी ब-याच बँका स्थापन झाल्या आणि त्यासही गेल्या परंतु श्री राजाराम महाराजांच्या आव्हानाने निघालेली "कोल्हापूर बँक" हीआज व्यापारी, शेतकरी, धंदेवाले, वगैरे लोकास सहाय्य होऊसन निरनिराळया उद्योगधंद्यास उत्तेजन मिळाले आहे. ब-याच मोठया प्रमाणावर साखरेचा कारखाना साखर उत्पादन करीत आहे तोही महाराजांच्या पूर्ण सहानुभुतीवर अवलंबून आहे. आता तरयाहीपेक्षा मोठा म्हणजे जवळ जवळ निम्या हिन्दुस्तानला ॲल्युमिनियम धातुचा पुरवठा

करण्याच्या कारखान्याची पूर्व तयारी बहुतेक झाली आहे. हा कारखाना उभारणारी कंपनी कै. श्री. शाहु महाराजानी बांधलेल्या महाराणी लक्ष्मीबाई तलावाचा बांध उंच करून त्यातील पाण्याचा विद्युत प्रवाह उत्पन्न करण्याकडे उपयोग करून घ्यावयाचा आहे. अशी या प्रचंड कारखान्याची उभारणी विंडिलानी घातलेल्या पायावर करून ते काम पुढे चालविण्यास कंपनीला नानाविध सवलती देऊन प्रोत्साहान देण्याचे श्रेय महाराजानाच आहे. या कामात महाराजांना त्यांचे निरगस, उत्साही, कार्यक्षम, स्वेच्छेने कार्य करणारे मुख्य प्रधान (प्राईमिनिस्टर) रावबहादुर दादासाहेब सुर्वे यांची अमुल्य मदत झाली आहे. त्यांना राऊंड टेबल कॉन्फरन्सचे सल्लागार या नात्याने भाग होण्यास आमंत्रण आले होते. याचा फायदा होऊन त्यांनी करवीर राज्याची व त्याच्या नृपतींची किर्ती दिंगत होईल अशा कारखान्याच्या योजनेची महुर्तमेढ त्याच्या विलायतेच्या सफरीत रोवली थोडयाच अवधीत या कारखान्यास मुर्त स्वरुप येईल.

खुद्द कोल्हापूर शहराकडे नजर फेकली असता महाराजांच्या कारकिर्दीत त्यांचे जे रुपांतर झाले आहे त्यांचे वर्णन कोल्हापूरास पलटणीत (कोल्हापूर इनफेट्री) नोकरी करून पुढे रेसिडेंटच्या हुद्यावर आलेल्या इंग्लीश अधिका-याने थोडया शब्दात चटकदार केले आहे. जगु काय यक्षणीच्या मारलेल्या कांडयाने कोल्हापूरचे स्वरूप संपूर्ण बदलेले आहे. (ए मॅजिक वॅन्ड हॅज ट्रान्सफर्ड ए नेचर ऑफ कोल्हापूर सिटी) खरोखर लोकांच्या आरोग्याकरिता महाराजांच्या आज्ञेने कांही दवाखाने व कांही डांबरी रस्ते, त्यांच्या बाजूस लोकांनी उभारलेल्या नवीनच सुंदर व भव्य इमारती कृष्णा नदीवरील पाणी देण्याची योजना व प्रीन्स प्रतापसिंह देवास यांचे नांव दिलेला पाण्याचा तलाव व त्यावरील हवाशिर बगीचा, चलचित्राचे कारखाने व चित्रे दाखविण्याची श्रृगारलेली गृहे लक्ष्मीपुरी, राजारामपुरी सारखी उपनगरे मेरीवेदर मार्केट, ओब्राचन टेक्नीकल स्कुल, म्याटरर्निटी हॉस्पीटलची इमारत विल्सन ब्रिज व सरफ्रेड रीक साइक्स बिल्डिंग या मुख्य इमारती कै.शाहु छत्रपती महाराज व पुण्य श्रीमती मातोश्री आईसाहेब महाराज कै. प्रिन्स राजाराम महाराज व मालेस्ली विल्सन यांचे कुशल कामगारानी तयार केलेले सुंदर पुतळे व या सर्वावर कळस करणारा पुण्यशील श्रीमन्नातोश्री आईसाहेबांनी देखरेख करून बांधलेला अप्रतिम सौंदर्याचा निवास प्रासाद ही पहिली असता माझी रेसिडंट साहेबांच्या उपरिनिर्दिष्ट शब्दात यत्किचिंतही अतिशयोक्तीचा आभ्यास नाही असे सहजच वाटेल.

या तोडीचेच किंबहुना याही पेक्षा जास्त महत्त्वाचे म्हणजे राज्यकारभार अंशत: लोकांवर सोपविणे हे होय, लोक शिक्षणाचा जसजसा प्रसार होत जाईलतसतसे अधीकाधिक प्रमाणाने हे काम त्यांच्याकडून करुनघेणे, प्रजेच्या संतोषास व सुखास कारणीभुत होते अशी खात्री झाल्याने महाराजांनी इलाखा पंचायतीसारखी संस्था स्थापन करुन तिच्यावर सुमारे 12 लाख रुपये खर्च करण्याची जबाबदारीटाकली आहे. या संस्थेस महाराजाकडून चांगले मदतनीस मिळून त्यावर दरबाराच्या कार्यक्षम अधिका-यांची सहानुभूतीवर नजर असलेने संस्थेचे लोकनियुक्त सभासद आपआपली कामे मोठया गावामध्यें म्युनिसिपालटी स्थापन करुन त्यांच्या स्थल सिमेपुरती आरोग्य व्यवस्थित राखण्याची जोखीम त्यांच्यावर टाकलीआहे. अशा प्रकारे लोक प्रशासन हळूहळू जनतेस अपायकारक न होता ज्यांच्या त्यांच्या पात्रतेने त्यांची सर्व प्रकारे उन्नती होईल असे हक्क त्यांना देऊन राजशकट सुरळीतपणे हाकण्याचे तत्त्व महाराजांनी आपल्या नजरेपुढे सतत ठेवले आहे. ब्रिटीश सरकाराशी महाराजांचे राजकीय संबंध पूर्ण स्नेहाचे व सलोख्याचे आहेत. राज्यात रुढ झाल्यापासून केवळ 12 वर्षांत महाराजांच्या दर्जाला व इभ्रतीला अनुसरुन मिळण्या जोगे उच्च दर्जाचे मानमहाराजांना मिळाले आहेत. इतक्या अल्पावधीत लेफटनंट कर्नल जी.सी.आय. इ. जी.सी.एस.आय. सारख्या लष्करीराजवैभवाच्या अत्युच्य पदव्या फारच थोडया महाराजांच्या वाटयास आल्या आहेत. राज्यातील प्रभुत्व जहागिरदारही पूर्णपणे आपआपल्या अधिकारावरुन वर्तनाने जहागिरीच्या कल्याणाकडे लक्ष देऊन आपले कारभार व्यवस्थित चालवित आहे.

या त्रोटक हकीकतीवरुन महाराजांचा कारभार प्रजेच्या सर्वांगिन उन्नतीला व सौख्याला कसा पूर्णपणे पोषक झाला आहे. हे सहज व्यक्त होईल.

महाराजांची अंगयष्टी मजबूत आहे व स्वत: घोडयांची गाडी हाकून चित्याकडून हरणाची शिकार करणे व भाला घेऊन घोडयावरुन डुकराची शिकार करणे हे महाराजांचे रानातील शिकारीचे आवडते मर्दानी खेळ आहेत. डुकरांच्या शिकारीत महाराजांच्या अश्वारोहण पटु ज्येष्ठ भगिनी स.सौ.सं.श्री. आक्कासाहेब महाराज महाराणी देवास मोठी पाती यांच्या उत्तेजक साहचर्याने शिकार फार जोमाने व हौसेने होणे महाराजांचा मातृनिष्ठा व भगिनी प्रेम हीअलौकीक आहेत. महाराजांचे सार्वत्रिक आदरयुक्त व प्रेमळ भाषण व वर्तनही पाहिली म्हणजे

सखीनव प्रीतियुजो नुजीविन

समानमानान् सुहृदस्व बंधु भि ।

स संवतं दर्शयित गतस्मय ॥

या राजनितीनिपुण नृपाच्या वर्णनाची आठवण होते. परंतु निष्कुलकशील, दयार्द्र अंत:करण व ममताळु स्वभाव या सात्विक गुणाबरोबरच महाराजांना असत्य व अन्याय यांची अंत:करणपूर्वक चीड आहे. त्यामुळे राज्यकारभारातील सर्व सन्मार्गवर्ती मनुष्यावर महाराजांचा पूर्ण दरारा आहे.

या प्रमाणे छत्रपतीच्या घराण्याच्या धवल कितीत भर घालून कै.कर्तृत्ववान पित्यालाही महाराजांनी मागे टाकिले. कै. भाग्यशाली वडिलांच्या आत्म्याची इच्छा पुत्रदिच्छेत्पराजयही परिपूर्ण केली.

शेवटी अशा नृपरत्नाचे सुखद वाढदिवस अगणित येवोत व पुण्यशील श्रीमन्मोतोश्री महाराणी आईसाहेब महाराज व स.सौ.सं.श्री. आक्कासाहेब महाराज यांचेही या वाढदिवसानिमित्त मत:पूर्वक सविनय अभिनंदन करून हा अल्पलेख पुरा करतों.

छत्रपती खास अंक

"सेवक" ( )

संपादक - ग.गो.जाधव

कोल्हापूर - शनिवार, तारीख ।। ऑगष्ट 1934 इसवी (अेक पहिला)

श्री

सर रघुनाथराव व्यंकाजीराव सबनीस, केटी.बी.अे.सी.आय.ई.

यांचे सेवेशी,

श्री

सर रघुनाथराव व्यकाजीराव सबनीस, केटी. बी. ए. सी. आय. ई.

यांचे सेवेशी,

मानपत्र
=====

परमपुज्य सरसाहेब,

आपण नुकतीच आपल्या आदर्श आयुष्याची 80 वर्षे पूरी करून 81 व्या वर्षात मोठया उत्साहाने पाऊल टाकीले आहे. या मंगल प्रसंगी आपल्या नानाविध गुणांवर लुब्ध झालेल्या आपल्या चहात्या करवीर नागरीकांना आपले हार्दिक अभिनंद करण्यास अभिमान वाटत आहे.

आपले उदात्त जीवित अनेक अमूल्या गुणाचे आश्रयस्थान झाले आहे. आपली तीव्र कार्यतत्परता, निरलस लोकहितपरायणता, सदैव समतोल राहणारी शांत निगर्वी वृत्ति पक्षातील व्यापक दृष्टी, साधी राहणी, आपला नियमीतपणा, गोड स्वभाव इत्यादिचे समग्र वर्णन कोणास करता येईल ? पण आपल्याशी संबंध आलेल्या मनुष्याच्या हृदयांत सरसाहेब म्हणजे मूर्तिमंत सौजन्य व सद्गुणाचे माहेरघर अशीच खूणगांठ पडलेली आहे. आपण आपल्या बहुमोल गुणांच्या जोरावर आज महत्पद प्राप्त करून घेतले आहे. आपला सेवा धर्म अत्यंत रेष्ठ प्रतीचा आहे. जो सेवाधर्म योग्यांनासुध्दा अगम्य तो आपण सर्वेषां अविरोधेने, एक प्रकारच्या अजातशत्रु वृत्तीने व अनुपम यशस्वी रितीने पार पाडला आपण कोल्हापूर दरबार, इंग्रज सरकार व सामान्य जनता यांच्यामधील दुवा बनुन निरनिराळया हितसंबंधाचा समन्वय घालण्यात जी राजसेवाकुशलता व लोकहितत्पारता दाखविली ती अपूर्व अशीच आहे.

राजर्षि श्री शाहु महाराजांच्या घडामोडीच्या कारकिर्दीत व प्रभू श्रीमंत छत्रपती राजाराम महाराज यांच्या प्रगमशील कारकिर्दीतही आपली मुत्सेदेगिरी व दुरदर्शीपणा उभय छत्रपतींना आपापली थोर ध्येर्य साध्य करणाच्या कामी सहाय्यभूत झाला आहे यांत शंका नाही. आपल्या वयोमानाकडे पाहून आपल्या जबाबदारीचा भार सेवानिवृत्तीने कमी झाला असला तरीही आजच्या समाजकारणात आपल्या सल्लामसलतीची गरज प्रत्यही भासत नाही.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

आपल्या एकनिष्ठ राजसेवेचा गौरव प्रजाहितदक्ष प्रभू श्रीमंत राजाराम महाराज यांनी भर पेन्शन देऊन केलेला आहे. यावरून आपण उत्कृष्ट राजसेवक तर ठरला आहातच, पण आपल्या जनसेवेने आपण आज खरे लोकसेवकसहीबनला आहांत, साम्राज्य सरकारनेही आपणास नाईट, सी.आय.ई. इत्यादि सन्मान्य किताब देऊन आपल्या सेवेचे चीज केले आहे. करवीर राज्यात अशी एकही सार्वजनिक संस्था नाही की, जिच्याशी आपला संबंध आलेला नाही. कोल्हापूर बॅंक, शुगर मिल्स, इत्यादि औद्योगिक संस्था, इलाखा पंचायतीस स्थानिक स्वराज्य संस्था शिक्षण मंडळ, विद्यापीठ इ. सारख्या शैक्षणिक संस्था, सत्यशोधक समाज, आर्यसमाज इत्यादिसारख्या धार्मिक व सर्व संस्थाना कायमचे ऋणी करून ठेविले आहे. आपले हे पितृतुल्य व सक्रीय सहानुभूति यांचे प्रोत्साहन पूर्ववत वरील संस्थाना व श्रीशालीनी राजे लेडीज क्लब सारख्या उदयोन्मुख स्त्रियांच्या संस्थानाही सदैव मिळत जाईल अशी उमेद आहे.

आपले आयुष्य हे एक मुर्तिमंत यशच आहे. मानवी जीवनाचा तो एक अपूर्व विजयच होय, प्रथम यशस्वी विद्यार्थी पुढे कुशल राजशिक्षक व नंतर छोटया मोठया नोकरीतून शेवटी छत्रपतीचे मुख्य प्रधान अशी आपली ही विजयपरंपरा पाहून आपल्या कर्तबगारीबद्दल कोणाला अभिमान व आदर वाटणार नाही ? वृध्दावस्थेतहीतरूणांना लाजविणारा अजम्य उत्साह आणि आरोग्यसंपन्न शरीरयष्टी, सर्वांगपरिपूर्ण विव्दता, कर्तबगारीच्या जोरावर मिळविलेली राजमान्यता व लोकमान्यता ही सर्व आपल्या यशस्वी जीवनाचीच निदर्शके होत.

भाग्यशाली सरसाहेब,

आपल्या सार्वजनिक जीवनक्रमाचा आरंभ अर्वाचीन महाराष्ट्राच्या अरूणोदय कालातच झाला या अनुकूल परिस्थितीतच राजर्षि श्रीशाहू महाराज आणि प्रभू राजाराम महाराज यांच्या सारखे उदारधी व गुणग्राहक प्रभूं आपणच लाभले. तेंशांतच आपल्या जीवनक्रमास सर्वतोपरी अनुरूप अशा धर्मपत्नीच्या लाभाचे प्रोत्साहन आपणांस मिळाले, पुत्रपौदीनी गजबजलेले घर, आर्थिक सुबता, उदंड आयुष्य विद्या व ऐश्वर्य यांनी भाग्यशाली

झालेला संसार आपणास लाभला आहे व यावर आपल्या सौजन्यपूर्ण व सेवाशील जीवनक्रमाने आपण जणू कळसच चढविला आहे. अशा भाग्यशाली थोर पुरुषाचा गौरव करण्यातत आनंद व सादर अभिमानवाटतो.

आपल्या अनुकरणीय गुणांनी, एकनिष्ठ राजसेवेने, निरलस लोकसेवेने, भाग्यशाली व यशस्वी जीवनाने आणि उज्वल आचार विचाराने आपण आमचे मार्गदर्शक व आदर्श झाला आहोत. तसेच आपण आपल्या पितृतुल्य वर्तनाने आबालवृध्दांच्या प्रेमास व आदरास पात्र झाला आहांत. आता यापुढेही आपले जिवित असेच लोकोपयोगी कार्याला लावण्यांस आपणांस अखंड आयुरारोग्य व ऐश्वर्य लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुन आम्ही आमच्या प्रेमाचे निदर्शक म्हणून हे मानपत्र आपणांस सादर करीत आहोत.

आपले नम्र,

करवीर नागरीक.

कोल्हापूर रेकॉर्ड ऑफिस

. खासुदगी (बारनिशी) बुक हुजरुन जमीनीच्या सनदा वगैरे लोकांस देण्यांस येतात त्याजबद्दल चिटणीस दप्तराकडील सन 1329 फसली.

सनदा पत्रे

सनद नंबर - 162 पान नंबर - 83

श्री शंभुभवानी शिक्का

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके 246 काल्युक्त नामसंवत्सरे पौष शुध्द 9 रोज भृगुवासरे क्षत्रिय कुलावंतस श्री राजा शाहु छत्रपती स्वामी यांनी राजश्री रघुनाथ व्यंकाजी सबनीस प्रधान गजेंद्रगडकर गोत्र भार्वत जात चांद्रसेनीय कायस्थ प्रभु, क्षत्रिय हुद्दा दिवाण नि. करविर यांसी दिले वतन पत्र ऐसाजे, आपणांस मौजे बेणिक्रे, कसबा कापशी पेटा गडइंग्लज येथील पाटील वतन इनाम दिले असोन त्याजबद्दलची सनद ही हुजरुन देण्यांत आली आहे. सदरहु वतनास जोडून आपण मौजे मजकूर येथील रि.सर्वे नंबर 157 एकर गुंठे 154835 आकार रुपये 64 व मौजे मजकूर येथे घर बांधणेस जागा बाजीराव सुबराव घोरपडे यांच्या ताब्यांत असलेली व हुसेन वलद याकूब पाटील यांचे खातेची यासी चतु:सिमा पु. दादा वलद बापु देसाई यांचे घर व परडे प. महावर वलद खादीव देसाई यांचे घर व परडे द. सर्वे नंबर 89 पैकी जमिन उत्तरेस मार्ग या चतु: सिमेतील मोकळी जागा गुंठे8699 चौरस फुट 7100 या प्रमाणे जमिन व घर जागा मिळावी म्हणून स्वामिस विज्ञप्ति सादर केल्यावरुन स्वामी कृपाळू होऊन सदहु जमीन व चतु:सिमा पूर्वक घर जागा पाटील वतनात सामील करुन जल,तरु,काष्ट,पाषाण निधिनिक्षेप सहित इनाम देण्यांत आली आहे. तरी वतनाची सेवा करुन सुखरुप राहणे जाणिजे मर्यादेयं विराजतेचे मोर्तब असून हुजूर निशाणी "निदेश समक्ष" ची आहे. रुजु.

खासुदगी (बारनिशी) बुक हुजरुन जमिनीच्या सनदा वगैरे लोकास देण्यात येतात त्याबद्दल चिटणीस दप्तराकडील सन फसली.

सनदा पत्रे
=======

सनद नंबर 168 पान नंबर 86

श्री शंभु भवानी शिक्का

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके सिध्दार्थीनाम संवत्सरे मार्गशिर्ष शुध्द 2 व्दितीया रोज इंदुवासरे क्षत्रिय कुलावंतस श्रीमन्महाराज शाहु छत्रपती स्वामी यांनी राजश्री रघुनाथ व्यकाजी सबनीस उपनाव प्रधान सबनीस गजेंद्र गडकर गोत्रभार्गव व जात चांद्रसेनीय कायस्थ प्रभु क्षत्रिय हल्लीचा हुद्दा दिवाण निसबत सरकार करवीर यांसी दिले वतन पत्र ऐसाजे –

तुम्ही स्वामीचे राज्यात गेल्या पंचवीस वर्षांत सरकारची नोकरी निरनिराळे म्हत्वाचे हुद्दयांचे जागेवर असताना इमाने इतबारे व एकनिष्ठपणे असाधारण परिश्रम घेऊन स्वामीचे, मनोद्दयानुरुप सतत करीत आला आहा व पुढेहीकरीतच आहां हे ध्यानी घेऊन त्याजबद्दल तुमचा संबंध लेकरानु लेकरोजोडणे विहित जाणून पूर्वी तुम्हांस तारीख 26 माहे जून सन 1921 इ. सविच्या सनदेने देण्यांत आलेल्या पाटीलकी वतनास जोडून आणखी जमीन व परडे इनामी वंश परंपरा तुम्हांस देणेचा स्वामीचा मानस असल्यावरून अलाहिदा मुलकी खात्याकडे हुकूम देण्यांत आला आहे. त्या बन्वये मौजे बेणिक्रे कसबा कापशी पेटा गडहिंग्लज येथील रिव्हिजन सर्वे सनंबर 157 एकशे सत्तावन एकर एकशे चोपन गुंठे पस्तीस 154835 आकार रुपये चोपन व मौजे मजकुर येथे घर बांधणेस जागा बाजीराव सुबेराव घोरपडे यांचे ताब्यांत असलेली व हुसेन बलद याकुब पाटील यांचे खातेची यांसी चतु:सिमा पूर्वेस दादा बलद बापु देसाई यांचे घर व परडे दक्षिणेस सर्वे नंबर 89 एकूण नवद पैकी जमीन पश्चिमेस महावर वलद खादीर देसाई यांचे घर व परडे उत्तरेस मार्ग या चतु:सिमेतील मोकळी जागा गुंठे 7100 चौरस फुट सात हजार एकशे या प्रमाणे जमीन व घर जागा दिवाणास होती. ती तुम्हास पाटीलकीवतनास जोडून वंशपरंपरा इनाम करुन दिलीअसे. येणे प्रमाणे एकशे चोपन एकर पस्तीस गुंठे 154835 जमीन व सात हजार एकशे चौरस फुट 7100 घर

जागा वतनास जोडून जल, तरू, काष्ट, पाषाण निधी निक्षेप सहित अजरामरामत इनाम करून दिले असे व जमिनीचा व घर जागेचा कब्जाही तुमचा पूर्वीच करून दिला आहे व ही सनद भोगवेटेसाठी दिली आहे. तरी तुम्ही वतना बद्दलची सेवा एकनिष्ठ करून वतनाचा अनुभव पुत्रपौत्रादी, वंशपरंपरेने करावा. या वतनास तुम्हा पासून नजर एक साल आकरा रूपये चौपन गांवी पाटलाचे काम करणारे इसमास स्केला प्रमाणे द्यावा लागणारा मुशाहिरा स्केल जुडी व मामुल व निमजुडी वतनाच्या इतर जमिनीचा आकार रूपये चारशे अकरा यातून वजा होत असल्याने बाकी फायदा रूपये चौपन राहतो तितकी रक्कम घेण्याची ठरवली आहे. सदर्हु वतनास जोडून ही अधिक दिलेली जमिन व घर जागा अनभवुन स्वामीस कल्याण चिंतुन वतनाबद्दल सेवाकरून सुखरूप असणे जाणिजे. बार नंबर 162/1328 फसलीच्या सनदेत वंशपरंपरा हा शब्द नसल्याने ती रहित करून आता ही सनद भोगवेटेस दिली आहे. तरी तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादी वतन वंशपरंपरा अनुभवुन सुखरूप राहणे जाणिजे "निदेश समक्ष" हुजूर निशाणी आहे मयादियं विराजतेचे मोर्तब आहे रूजू.

खासुदगी (बारनिशी) बुक हुजूरून जमिनीच्या सनदा वगैरे लोकास देण्यास येतात त्याजबद्दल चिटणीस दप्तराकडील सन 1330 फसली.

सनदा पत्रे
=======

सनद नंबर 192 पान नंबर 92.

श्री शंभु भवानी शिक्का

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके 246 सिध्दार्थी नामसवत्सरे मार्गशीर्ष शुध्द 2 व्दितीया रोज इंदुवासरे क्षत्रिय कुलवंतस श्रीमन्महाराज शाहू छत्रपती स्वामी यांनी राजश्री मालोजीराव खंडेराव घोरपडे मामलेदार पेटा गडइंग्लज यांसी आज्ञा केली ऐसाजे –

राजश्री रघुनाथ व्यंकाजीउपनांव प्रधान सबनीस गजेंद्रगडकर गोत्रभार्गव जात चांद्रसेनीय कायस्थप्रभु क्षत्रिय हल्लीचा हुद्दा दिवाण निसबत सरकार करवीर यांनी स्वामिंचे राज्यात गेल्या 25 वर्षांत सरकारची नोकरी निरनिराळे महत्त्वाचा हुद्याचे जागेवर असताना इमाने इतबारें व एकनिष्ठापणे असाधारण परिश्रम घेऊन स्वामीचे मनोंदयानुरुप सतत करीत आले व पुढेही करीत आले व पुढेहीकरीतच आहेत हे ध्यानी घेऊन त्यांचा संबंध या राज्याशी लेकरानुलेकरी जोडणे हे विहीत जाणून त्याजवर स्वामी कृपाळू होऊन मौजे बेणिक्रे कसबा कापशी पेटा गडइंग्लज येथील पाटील वतन वंशपरंपरा इनाम देऊन त्याजबद्दलची सनद त्यांच्याकडे भोगवटेस दिली आहे. सदर वतनास जोडून मौजे मजकूर येथील रि.सर्वे नंबर 157 एकशे चोपन एकर पस्तीस गुंठे 154835 व परडे वंशपरंपरा इनाम त्यांस आणखी देण्याचा स्वामींचा मानस असल्या वरून मौजे मजकूर रि.सर्व्हे नंबर 157 एकर गुंठे 154835 जमीन आकार रुपये 54 व मौजे मजकूर येथे परडे घरबांधणे करीता जागा बाजीराव सुबराव घोरपडे यांच्या ताब्यात असलेली व हुसेन बलद याकूब पाटील यांचे खातेची यांसी चतु:सिमा पूर्वेस दादा बलद बापु देसाई यांचे घर व परडे द.सर्वे नं.89 पैकी जमिन प.महावर बलद खादीर देसाई यांचे घर व परडे उ. मार्ग या चतु:सिमा तील मोकळी जागा गुंठे 865 चौरस फुट 7100 एकाहत्तरचे या प्रमाणे चतु:सिमा पूर्वक परडेची घर जागा व जमीन मिळून दोन्ही दिवाणात असलेल्या मशारनिल्हे सबनीस दिवाण

साहेब यांना पाटील वतनात सामील करून वंशपरंपरा इनाम जल, तरु, काष्ठ, पाषाण निधी निक्षेप सहित अजरामरामत इनाम करून देऊन कब्जाही त्यांचेकडे दिला असोन भोगवटेस अलाहिदा सनद त्यांस दिली आहे. या नवीन दिले जमिनीच्या आकारा इतका एक साल नजराना 54 रुपये घेण्याचे ठरविले असोत त्या प्रमाणे भरणा जाहला असोन त्याचा दाखला घेऊन मामले कडील ताकीद मोकदमानी यास देऊन मशारनिल्हे यांसी पुत्रपौत्रादी वंशपरंपरा चालवीत जाणे आणि या पत्राची तालिख लिहून घेऊन अस्सल पत्र मशारनिल्हे यांसी भोगवेटेस परतोन देणे। जाणिजे "निदेश समक्ष" चे हुजूर निशाणी असोन मर्यादियं विराजतेचे मोर्तब आहे. रुजू.

खासुदगी (बारनिशी) बुक हुजरून जमिनीच्या सनदा वगैरे लोकास देण्यात येतात त्याजबद्दल चिटणीस दप्तराकडील सन फसली

सनदा पत्रे
=======

सनद नंबर 198 पान नंबर 94

श्री शंभु भवानी माथे शिक्का

स्वस्तिश्री राज्यभिषेक शके 243 अनजनाम संवत्सरे कार्तिक बहुल 7 रोज भृगुवासरे क्षत्रिय कुलावंतस श्री राजा शाहु छत्रपती स्वापमी यांनी राजमान्य राजश्री रघुनाथ त्र्यंकाजी सबनीस सी.बाय.ई. दिवाण निसबत सरकार करवीर यांसी आज्ञा – आपण स्वामी संनिध असल्याने श्रीमंत पिराजीराव बापुसाहेब घाटगे सरज्याराव वजारत मा आब सी.बाय.ई.एस.आय. संस्थान कागल यांचेशी निकट संबंध उत्पन्नझाला आहे व त्यांचे शिक्षणाचे कामात व इतर कामात वेळोवेळीआपला अत्यंत उपयोग झाला आहे. म्हणून आपले ठिकाणी त्यांची पुज्य बुध्दी वसत आहे. यांचे निदर्शन म्हणून आपणास कागल संस्थानापैकीमौजे यमगे येथे सरकार हक्कातील जमीन एकतीस एकर तेरा गुंठे आकार सत्तर रूपये आठ आणेची वंशपरंपरा जात इनाम देणेची आहे. अशी त्यांनी स्वामीजवळ इच्छा प्रदर्शित केल्या वरून स्वामीनी त्यांस अनुमती दिलीआहे. तरी त्यांस अनुसरून आपणास मौजे यमगे संस्थान कागल येथील सरकार हक्काची खाली लिहीले प्रमाणे जमीन –

रि.सर्वे नंबर	एकर गुंठे	आकार रूपये
55 पोट नंबर 3	287	11
177	589	24
202	283	6
33 पोट नंबर 7	286	10
288	1817	188
296	15834	10
344	2818	8
	31813	7088

एकूण एकतीस एकर तेरा गुंठे आकार रुपये 7088 ची जल, तरु, काष्ठ, पाषाण निधी निक्षेप सहित निरंतर जात इनाम मे. जहागिरदार कागल सिनिअर यांनी दिली आहे. ती आपणाकडे वंशपरंपरा इनाम चालविली जाईल सदर्हु जमिन आपल्या सरळ वंशजाकडे चालविणेची असोन त्रयस्थास देणेची नाही. असा मशारनिल्हे जाहागिरदार यांचा हेतु स्वामिस सम्मत आहे. तरी सदरची जमीन आपणाकडे वंशपरंपरा इनाम रहावी म्हणून आपण व जहागिरदार यांनी स्वामिस विनंती केली म्हणोन कृपाळूपणे आपल्या सरळ वंशजाकडे पुत्रपौत्रादि जात इनाम चालविणे बद्दल हुजूर आज्ञेत आले आहे. तरी आपण पुत्रपौत्रादि इनाम अनभवुन सुखरुप स्वामीचे राज्यात राहणे जाणिजे "निदेश समक्ष" हुजूर निशाणी व मोर्तब मर्यादेयं विराजतेचे असे रुजू हे बहाद्दरी पत्र 128 नंबर जवळचे बार करणेचे राहील्याने येथे बार केले आहे.

करविर सरकारचे ग्याझिट, 6 जानेवारी 1926.

हुजूर ऑफिस, फायनॅन्स डिपार्टमेंट, कोल्हापूर.

तारीख : 6 जानेवारी 1926 इ.

मेहेरबान रावबहादूर सर रघुनाथराव व्यंकाजी सबनीस, केटी., सी.बाय.ई. दिवाण साहेब निसबत सरकार करविर यांनी आपल्या वाधक्याक्यामुळे आपल्यांस नोकरीतून रिटायर होणेस परवानगी मिळावी म्हणून मजकूरचा विनंती अर्ज हुजूर सेवेसी तारीख 24 माहे सप्टेंबर 1925 रोजी सादर केलेवरून हुजूरून आज्ञा झाली ती :-

"रावबहादूर सर रघुनाथराव व्यंकाजी सबनीस, केटी., सी.बाय.ई., यांचा संबंध आमचे राज्याशी जानेवारी 1893 पासून सुरु झाला. त्यापूर्वी ते अजमासें 16/17 वर्षे ब्रिटीश सरकारचे शिक्षण खात्यांत नोकरीस होते. आमचे कै. परमपूज्य पिते यांच्या शिक्षणक्रमाच्या बहुतेक अखेरच्या वर्षाचे त्यांचे शिक्षकाच्या जागी सर रघुनाथराव यांची योजना झाली. त्यानंतर सन 1894 साली कै. हुजूरचे हाती राज्यसूत्रे आल्यावर त्यांनी त्यांचे सन्माननीय टयुटर व गार्डियन मि.(हल्ली सर) एस.एम.फ्रेजर, के.सी.एस.आय. यांचे सल्याने आपले हुजूर चिटणीसांच्या महत्वाचे व विश्वासाचे जागी सर रघुनाथराव यांची नेमणूक केली. नंतर दोन वर्षाचे आतच सरसुभे यांची जागा रिकामी झाल्यावर त्या जागी त्यांची नेमणूक झाली व त्यानंतर दोन वर्षे पुरी होणे पूर्वीच त्यांची तरतरी व वाकबगारी पूर्णपणे नजरेस आल्याने दिवाणाचे जागी कायमपणे त्यांना नेमणेत आले. दिवाण या नात्याने कौन्सिलचे प्रेसिडेंट, प्लेग व फॅमिन कमिशनर इत्यादि जोखमीची कामे सर रघुनाथराव यांना करावी लागली. सन 1897 पासून आजपर्यंत आमचे राज्यांतील दिवाण-गिरीचे अत्यंत महत्वाचे व जबाबदारीचे काम ते विश्वासाने करीत आहेत. खुद्द आमचेही शिक्षणावर त्यांचीच देखरेखस असल्याने आम्हालाही त्यांचे अनुभवाचा व प्रेमळ सल्याचा फायदा मिळाला आहे. आमचे कै. पित्यांबरोबर व आमचेही बरोबर विलायतेस येऊन, त्यांचेकडून मोठया दक्षतेने व कळकळीने कामगिरी झाली आहे. यांचे सुमारे बत्तीस वर्षाचे नोकरीचे अवधीत दरबारचे हितसंबंधाची महत्वाची व नाजूक कामे त्यांनी मोठया शांतपणाने आस्थापूर्वक, निरभयपणे मोठया कुशलतेने व अत्यंत प्रामाणिकपणे जडीला नेल्याने आमचे दरबारचा दर्जा व इभ्रत कायम राहून राज्याची

उत्तरोत्तर भरभराट होत चालली आहे. तर रघुनाथराव यांच्या नेतृत्वाखाली त्यांचे दक्षतेने राज्याचे उत्पन्नही बरेच वाढले आहे.

"2 मागासलेल्या व अस्पृश्य वर्गासंबंधी यांची पूर्ण सहानुभूती असल्याने त्यांची बौध्दिक, सामाजिक, राजकीय वगैरे सर्व बाजूंनी उन्नति होण्यास सर रघुनाथराव यांची अमूल्य मदत झाली आहे.

"3 दरबारचे हितास यत्किंचितही बाध न आणता सर रघुनाथराव यांनी ब्रिटीश सरकारशी दरबारचे संबंध पूर्ण मित्रत्वाचे व सलोख्याचे ठेवणेमध्यें मन:पूर्वक सहाय्य केले आहे. या गोष्टीची साक्ष खुद्द त्यांना ब्रिटीश सरकारातून मिळालेल्या "रावबहादूर" "सी.बाय.ई." व "नाईट" या पदव्यांनी पटत आहे. आमचे कै. परमपूज्य पित्याकडून सर रघुनाथराव यांचे कर्तृत्व व पुर्ण निस्सिम स्वामिभक्ति याबद्दल त्यांना बहुमानाचे सुवर्णपदक जमिनींची व नत्कीची वगैरे इनामें वेळोवेळी देणेत आली आहे. सुमारे तीन वर्षांचे आमचे कारकिर्दीचे अवधीत आमचाही त्यांचे संबंधाचा अनुभाव आमचे कै. पित्याप्रमाणेच आहे. याबद्दल आम्हाला अत्यंत समाधान वाटत आहे. याप्रमाणे सतत बत्तीस वर्षांवर आमचे राज्याची एकनिष्ठपणे अंत:करणपूर्वक मोठया दक्षतेने व अत्यंत काळजीने सेवा करून राजा, प्रजा व ब्रिटीश सरकार या त्रिवर्गाचेही प्रेम त्यांनी उत्तम प्रकारे संपादिले आहे.

करविर सरकारचे ग्याझेट, 6 जानेवारी 1926.

सर रघुनाथराव यांचे विनंती अर्जात त्यांनी आपले वार्धक्यामुळे रिटायर होणेची परवानगीची मागणी केलेप्रमाणे त्यांना नोकरीतून आम्ही मुक्त करीत आहो. अशा, कर्तृत्ववान व भक्तिमान राजनिष्ठ सेवकाचा आमचे दिवाणगिरीशी संबंध सुटत असल्याने आम्ही आमची दिलगिरी या लेखाने व्यक्त करत आहो. खरोखरीच सर रघुनाथराव यांचा हा रिटायमेंटचा विनंती अर्ज मंजूर करताना सही करणेस आमची लेखणी पुढे चालत नाही.

"4 सरकारी नोकरीच्या पंचावन वर्षाचे मुदतीनंतरही आमचे कै.पित्याचे व खुद्द आमचे इच्छेनुरूप त्यांनी तेरा वर्षावर आपले अनुभवाचा फायदा आमचे राज्यास दिला व अहर्निश राज्यसेवा केली या सर्व गोष्टी ध्यानी आणून विशेष हुकूमाने त्यांना त्यांचे हल्लीचे पगारा इतकी म्हणजे दरमहा एक हजार 1000 रुपयेप्रमाणे तारीख 2 जानेवारी 1926 पासून पेन्शन देण्याचे आम्ही मंजूर केले आहे. या पेन्शनीचा त्यांना दिर्घकाल लाभ मिळून इतउत्तरहि त्यांचे सल्याचा फायदा आम्हाला वेळोवेळी होवो अशी आमची इच्छा आहे.

"5 सर रघुनाथराव यांना जरी आम्ही रिटायर होणेची परवानगी देत आहों तथापि ते आमचे सानिध्य करविरी राहून आपल्या इतर कामापेक्षाही जास्त काळजीने दरबारचे हिताचा सल्ला हल्ली ते देत आहेत, त्याप्रमाणे तो सदैव देतील अशी आमची पूर्ण खातरी आहे व आम्हीही तो अत्यंत उल्हासाने घेत जाऊं.

"6 सर रघुनाथराव यांनी दरबारची ज्याप्रमाणे प्रामाणिकपणे एकनिष्ठेने, काळजीपूर्वक मोठया चातुर्याने सतत बत्तीस वर्षे अलौकिक सेवा केली त्याप्रमाणे प्रत्येक नोकराकडून होणे फारच कठीण आहे. तरीपण सर्व लहान थोर अम्मलदार त्यांचे उदाहरण घेऊन ते त्यांचे अनुकरण करतील अशी आम्ही उमेद बाळगतो."

सदर प्रमाणे हुजूर आज्ञा जन.ठ.नं. 569 लगत कि.आ.नं.227 तारीख 2-1-26 ची आज्ञा झालेप्रमाणे सदरची प्रसिध्दी करणेत आली आहे. ता. 6-1-1926.

हुजूर आज्ञेवरून,

डी.बी.फडनीस
हेड् क्लार्क

डी.एम.भोसले,
फिनॅनशिअल सेक्रेटरी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR